MAH/MUL/03051/2012
ISSN-2319 9318

Peer Reviewed International Refereed Research Journal

# VIDYAWARTA

Special Issue Vol - 03 September 2019

Indian council of social science research

Impress
Impactful Policy Research in Social Science

Government of India
Ministry of Human Resource Development

Sponsored

One Day Interdisciplinary National Level Seminar on

## SELF HELP GROUPS AND SOCIO-ECONOMIC EMPOWERMENT OF WOMEN

Friday, 27th September, 2019



Organized By

Department of Economics
Shri Balaji Sansthan, Deulgaon Raja's
SHRI VYANKATESH ARTS, COMMERCE & SCIENCE COLLEGE
Deulgaon Raja, Dist.Buldhana- 443 204.
NAAC Re-accredited at 'B' Level

41) महिला बचत गट एक अभ्यास
अंकुश लक्ष्मण गावीत & डॉ.विशाल एस. करपे, विसरवाडी ||172

42) हिंगणघाट तालुक्यातील महिला बचत गटांचा विशेष अभ्यास
डॉ. विठ्ठल घिनमिने, जि. वर्धा ||175

43) स्वयं सहाय्यता बचत गटाद्वारे महिलांचे सबलीकरण
प्रा.डॉ.विठ्ठल निलकंठ ठावरी, जि.चंद्रपूर ||180

44) महिला सक्षमिकरणासाठी स्वयं:सहायता गट: एक प्रभावी माध्यम
प्रा. डॉ. योगेश दा. उगले, जि. यवतमाळ ||184

45) स्वयंसहायता बचत गट आणि महिलांचे आर्थिक सामाजिक सबलिकरण
प्रा. डॉ. रामदास डी. मुक्टे, हिंगोली ||188

46) स्वयं सहाय्यता गटाच्या माध्यमातून महिलांचे सक्षमीकरण (Women's Empowerment ...
डॉ. गजानन भा. पाटील, नागपूर ||190

47) स्वंय साहाय्यता गट आणि महिला सक्षमीकरण
श्री.युवराज धनाजी खडके जि.सोलापर ||197

48) इगतपुरी तालुक्यातील स्त्रीचळवळीचे महिला सक्षमीकरणातील महत्व व भूमिका
प्राचार्या डॉ. ज्योत्स्ना दिनकरराव सोनखासकर & वाजे कल्पना महादू, नाशिक||201

49) भारतातील स्वंय — सहाय्यता बचत गटाचे स्वरूप
प्रा.एल.एस.सिताफुले, जि. रत्नागिरी ||204

50) बचत गटातुन महीलांचे आर्थिक सामाजिक सक्षमिकरण
प्रा. मनिषा म. किर्तने, वाशिम ||209

51) स्वयंसहाय्यता बचत समूहांचा ग्रामीण जीवनशैलीवरील प्रभावाचा अभ्यास : अकोला ...
अनंत शत्रुघ्न गावंडे, अमरावती ||211

52) ग्रामीण एवं शहरी महिलाओं के आर्थिक विकास में स्वर्ण जंयती अल्प ऋण योजना ...
डॉ. श्वेता शर्मा, इन्दौर ||215

53) स्व सहायता समूहों के माध्यम से महिलाओं का आर्थिक व सामाजिक विकास ...
डॉ. जे. डी. गुप्ता, अमरावती ||219

www.vidyawarta.com/03 | http://www.printingarea.blogspot.com



PRINCIPAL
Shivaji College, HINGOLI

45

# स्वयंसहायता बचत गट आणि महिलांचे आर्थिक सामाजिक सबलिकरण

प्रा. डॉ. रामदास डी. मुक्टे
शिवाजी महाविद्यालय हिंगोली

**********

## प्रस्तावना

महिला हा समाजातील एक महत्वपुर्ण घटक आहे. समाजाच्या विकासामध्ये महिलांची भुमिका महत्वपुर्ण आहे. अलीकडील काळात सामाजिक क्षेत्राबरोबरच राजकीय, आर्थिक क्षेत्रात महिला सक्रीय कार्यरत असल्याच्या दिसुन येतात. परंतु हे प्रमाण अतिशय अल्प आहे. भारतात संस्कृती, रूढी परंपरा यामध्ये आजही भारतीय स्त्री जोखडलेली असल्याचे दिसुन येते. अशा महिलांचे प्रमाण आधिक आहे. महिलांना आजही संपत्तीचा भागीदार किंवा त्यांचे नावे संपत्तीत असल्याचे अल्पप्रमाण आहे. घरकाम करणे, मुलांचा सांभाळ करणे अशा कार्यामध्ये भारतीय स्त्रीयांचे प्रमाण आधिक आहे. आर्थिक व्यवहारात महिलांचे प्रमाण अल्प आहे. या स्थितीत सुधारणा व्हावी आणि भारतीय महिलांच्या सामाजिक, आर्थिक स्थितीत सुधारणा होण्यासाठी अनेक प्रयत्न करण्यात येत आहेत. त्यामधील एक प्रयत्न म्हणजे स्वंयसहायता बचत गट होय.

## संशोधनाचा उद्देश

१. स्वंयसहायत्ता बचत गटाची संकल्पना स्पष्ट करणे.

२. स्वंयसहायत्ता बचत गटाचा महिलांच्या आर्थिक व सामाजिक सबलीकरणावर झालेल्या परिमाणाचे विश्लेषण करणे.

## संशोधन पध्दती

संशोधन कार्यासाठी आवश्यक असणारी संशोधन पध्दती मध्ये प्राथमिक संशोधन पध्दती व दुय्यम संशोधन पध्दती अशा दोन पध्दती उपलब्ध असुन त्यापैकी दुय्यम संशोधन पध्दतीचा अपयोग करण्यात आली आहे.

## स्वंयसहायता बचत गटाची संकल्पना

स्वंय सहायता बचत गटाची सुरूवात प्रथम बांगला देशात सन १९७० मध्येझाली. बचत गटाचे प्रवर्तक महंमद युनूस हे आहेत. महाराष्ट्रात बचत गटाची स्थापना सर्वप्रथम सुधाताई कोठारे यांनी केली[१]

संघटितपणे एकमेंकाना समजून घेत, सहाय्य करत ठराविक काळाने बचत जमा करण्याच्या निमित्ताने एकत्र येणारा गट म्हणजे स्वयंसहायता बचत गट होय[२]

स्वयंसहायता बचत गट निर्माण करण्यासाठी जास्तीत जास्त २० स्त्रीया, पुरुष किंवा स्त्री–पुरुष एकत्र येउन बचत गट स्थापन करु शकतात. ठरलेल्या कालावधीत ठरलेली रक्कम बँकेत खाते काढुन जमा केली जाते. व ती रक्कम गटातील सदस्यांना कर्ज रुपाने कमी व्याजाने उपलब्ध होते. कर्ज सभासद हफ्त्या–हफ्त्याने कर्जाची रक्कम परत करु शकतात. बचत गटांना बॅकांकडुन कर्ज मिळावे यासाठी १९९८ पासुन केंद्रीय अर्थसंकल्पात आर्थिक तरतुद करण्यात आली आहे.[३]

## स्वयंसहायत्ता बचत गट आणि महिलाचे आर्थिक, सामाजिक सबलिकरण

महिलांच्या सामाजिक, आर्थिक, विकासाचा केंद्रबिंदु म्हणुन स्वयंसहायत्ता बचत गटाचीओळख आज संपर्णु भारतात आहे. कारण ख–या अर्थाने महिलांचे सक्षमीकरण बचत गटातुन होत आहे. बेरोजगार, उत्पादनाच्या प्रक्रियेत सहभागी नसलेल्या महिलांचे मोठे प्रमाण आहे. या महिलांना उत्पादनाच्या प्रक्रियेत, व्यवसायात सहभागी करण्याचे कार्य स्वयंसहायत्ता बचत गटाद्वारे होत आहे. एकंदरीत महिलांच्या सामाजिक व आर्थिक विकासामध्ये होणा–या बदलाचे विश्लेषण पुढील प्रमाणे करता येईल.

### १. महिलांचे संघटन झाले.

स्वयंसहायता बचत गटाची निर्मिती करण्यासाठी



PRINCIPAL
Shivaji College, HINGOLI



अनेक महिलांना एकत्र यावे लागते. त्यानंतर बचत गटाची निर्मिती होते. त्यामुळे अनेक महिला एका विचाराने एकत्र येण्यास सुरुवात झाली महिलांमध्ये संघटन झाल्याचे दिसुन येते.

### २. बॅंकव्यवहार करण्याची संधी प्राप्त झाली.

बचत गटाची स्थापना झाल्यानंतर गटाचे संपुर्ण आर्थिक व्यवहार हे बॅंकेमार्फत चालतात. त्यामुळे बचत गटाच्या सदस्या महिलांना बॅंक व्यवहार करणे अप्रत्यक्षपणे अनिवार्य होते. याचा परिणाम महिला बॅंक व्यवहारामध्ये सहभागी होत आहेत. बॅंक व्यवहाराची संपर्ण माहिती महिलांना उपलब्ध होत आहे. उदा. खाते काढणे, चेक देणे यासारखे व्यवहार महिला करीत आहेत.

### ३. आर्थिक आधार मिळाला.

बचत गटाच्या माध्यमाने महिलांना आपल्याकडे जमा असलेली रक्कम बॅंकेत ठेवुन ठेव निर्माण करण्याची सवय लागली. बॅंकेत जमा झालेली रक्कम आणि रिझर्व्ह बॅंकेच्या आदेशान्वे राष्ट्रीयकृत व जिल्हा बॅंका बचतीच्या आधारे मोठ्या प्रमाणात कर्ज उपलब्ध करून देत आहेत. त्यामुळे महिलांना बॅंकेकडुन आर्थिक आधार प्राप्त झाल्याचा दिसुन येतो.

### ४. महिलांमध्ये परस्पर सहकार्याची भावना निर्माण झाली.

स्वयंसहायता बचत गटाच्या माध्यमातुन महिलांमध्ये परस्पर सहकार्य करण्याची भावना निर्माण झाल्याचे दिसुन येते. कारण बचत गटातुन आर्थिक सहाय करुन एकमेकांच्या गरजा, अडचणी पुर्ण करण्याची शक्ती महिलांकडे प्राप्त झाली आहे. त्यामुळे एकमेकांच्या दैनंदीन व्यवहार अडचणी परस्पर सहकार्य करुन दुर केल्या जात आहेत.

### ५. महिलांना बचतीची आवड निर्माण झाली.

स्वयंसहाय बचत गटामध्ये दर महिन्याला एक विशिष्ट रक्कम बॅंक खाते मध्ये जमा करावी लागते. त्यामुळे ही रक्कम जमा करण्याच्या उद्देशाने महिला बचत करतांना दिसुन येतात.

### ६. महिलांमध्ये उद्योजकता विकास झाला.

स्वयंसहाय बचत गटांच्या माध्यमातुन महिलां मधुन लघु–कुटीर उद्योग निर्मितीसाठी बॅंकेकडुन अर्थसहाय उपलब्ध करुन दिले जाते. त्यामुळे या अर्थसहायाचा आधारे महिला दुग्धव्यवसाय, पशुपालन या व्यवसाया बरोबरच कापड उद्योग, हस्तकला यासारख्या उद्योगा मध्ये महिला सहभागी होउुन उद्योजक म्हणुन समोर येत आहेत.

### ७. महिलांचे सामाजिक सबलीकरण झाले.

समाजामध्ये महिलांना दुय्यम स्थान होते. आर्थिक व्यवहारात महिलांचा सहभाग अतिशय अल्प होता किंवा नव्हता. समाजात महिलांची ओळख केवळ चुल आणि मुल एवढीच होती. परंतु आज स्वयंसहाय बचत गटामुळे महिलांचे समाजातील स्थान वाढले आहे. उद्योजक म्हणुन स्त्रीयांची ओळख निर्माण होत आहे. आर्थिक जडणघडणीमध्ये महत्वाचा सहभाग असल्याचा दिसुन येत आहे. अनेक बचत गटाच्या महिला पुरुषांच्या बरोबरीने उद्योग व्यवसायात कार्य करीत असतांना दिसुन येतात.

### ८. महिलांच्या निर्णय क्षमतेमध्ये वाढझाली.

स्वयंसहाय बचत गटामुळे महिला बॅंकींग, व्यवहार, व्यापार, उद्योग अशा विविध क्षेत्रात कार्यरत झाल्या आहेत. त्यामुळे त्यांना स्वतःचे निर्णय स्वतः घ्यावे लागतात. अनेक वेळा तात्काळ निर्णय घेण्याची आवश्यकता, प्रसंग असतो. त्यामुळे बचत गटात काम करणा–या महिला तात्काळ निर्णय घेतांना दिसुन येते. त्यामुळे महिलांच्या निर्णय क्षमतेमध्ये वाढ झाल्याचे दिसुन येते.

### ९. पुरुषावरील आर्थिक अवलंबित्व कमी होत आहे.

बचत गटामुळे महिला स्वतः उद्योग, व्यवसाया मध्ये सहभागी होते. त्यामुळे महिलांना आर्थिक उत्पन्नाचे स्त्रोत उपलब्ध झाले आहेत. यामुळे त्यांचे पुरुषावरील आर्थिक अवलंबित्व कमी होत आहे.

### १०. समाजातील स्त्री–पुरुष भेद कमी होत आहे.

महिला उद्योग, व्यवसायामध्ये सक्रीय सहभागी झाल्यामुळे पुरुषांच्या बरोबरीने काम करीत असतांना पर्यायाने उत्पन्न मिळवित असतांना दिसुन येतात. त्यामुळे पुरुषच उत्पन्न मिळविणारे मुख्य घटक म्हणुन पाहण्याचा समाजाचा दृष्टीकोन बदलत आहे.

**संशोधनाची निष्कर्ष**

प्रस्तुत संशोधन कार्याची निष्कर्ष पुढीलप्रमाणे

१. स्वयंसहाय बचत गटामुळे महिलांचा समाजातील दर्जा उंचावण्यास मदत झाली आहे.

२. उत्पादन व्यवसाय, उद्योग या प्रक्रियेत महिलांचा सहभाग स्वयंसहाय बचत गटामुळे वाढता आहे.

३. महिलांचे पुरुषावरील आर्थिक अवलंबित्व कमी होत आहे.

४. महिला ऐतखावु वर्ग आहे हा समाजाचा दृष्टीकोण बदलत आहे.

५. महिला सामाजिक, आर्थिक बदलांचा एक महत्वपुर्ण घटक आहेत. ही ओळख महिलांची निर्माण झाली आहे.

**संदर्भ ग्रंथ**

१. सौ. प्र. गौ. तालंगकर, भारतीय महिलापुढील आव्हाने आणि सोडवणुक मार्च २०१७ ज्योतीचंद्र पब्लीकेशन, लातुर. पृष्ठ क. ३१

२. nr.m.wikipedia.org.com

३. कित्ता

४. प्रा. डॉ. मंगनाळे, प्रा. जगताप, महिला बचत गट आणि ग्रामीण विकास मुक्त रंग प्रकाशन, लातुर.

५. महिला बचत गट मार्गदर्शिका, चौधरी लॉ पब्लिशर्स, जळगांव.

❑❑❑

46

# स्वयं सहाय्यता गटाच्या माध्यमातून महिलांचे सक्षमीकरण

**(Women's Empowerment through Self-Help Groups)**

**डॉ. गजानन भा. पाटील**
प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग प्रमुख,
मनोहरराव कामडी महाविद्यालय महाल, नागपूर

************

भारतातील समाज व्यवस्थेमुळे भारतात महिलांना नेहमीच दुय्यम स्थान देण्यात आले. वैदिक काळ सोडल्यास सर्वच काळात महिलांना मानहानीचा सामना करावा लागला आहे. भारतीय संस्कृती पुरूषप्रधान म्हणून ओळखली जाते. पुरूषवर्गाने महिलांना कमी लेखून त्यांचे क्षेत्र चूल आणि मूल एवढेच बंदिस्त केले. त्यांना बुद्धी नसते. त्या दुर्बल असतात. कोमल अंत:करणाच्या असतात. म्हणून त्यांना सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक, राजकीय आणि सांस्कृतिक क्षेत्रां मध्ये विकास करण्याकरिता वाव दिला जात नाही. माहिती आणि तंत्रज्ञानाच्या आजच्या काळातदेखील महिला साक्षरतेचे प्रमाण केवळ ३५%पेक्षा कमी आहे. तसेच आजही ७२%महिला आर्थिकदृष्टया परावलंबी आहेत. काही महिला, पती किंवा मुलांवर अवलंबून आहेत. २८%स्वावलंबी आहेत. परंतु तिचे सामाजिक स्वातंत्र्य एक तर तिच्या पतीने किंवा समाजाने मर्यादित केले आहे. आज महाराष्ट्रात स्थानिक स्वराज्य संस्थेत ३३%जागा राखीव असल्या तरी अनेक ठिकाणी महिलांना स्वतंत्रपणे राज्यकारभार करता येत नाही. त्या केवळ रबरी शिक्का म्हणून त्यांचा वापर होतो. थोडक्यात, आधुनिक काळातही पुरूष वर्चस्वाची मानसिकता संपलेली दिसत नाही. सामाजिक दडपणामुळे महिलातील आत्मविष्वास नष्ट करून त्यांना गुलाम ठेवण्याचे आजही प्रयत्न केले जात आहे अलीकडे



PRINCIPAL
Shivaji College, HINGOLI



मात्र हया परिस्थितीत बदल झाल्याचे दिसते. याचे प्रमुख कारण म्हणजे भारतात शिक्षणाचा प्रसार व प्रचार होय. महिलांमधील गुलामगिरी तोडण्याचे कार्य शिक्षणामुळे प्रभावीपणे सुरू झाले आहे. त्यामुळे महिला पुढे येऊन सामाजिक आणि आर्थिक क्षेत्रात सक्षम होण्याचा प्रयत्न करीत आहेत.

आधुनिक काळात महिलांचे सक्षमीकरण हा जागतिक अभ्यासाचा व चर्चेचा विषय झाला आहे. जागतिक स्तरावर अनेक सेवाभावी संस्था पुढे येऊन महिलांच्या सक्षमीकरणाबाबत चर्चा घडवून आणत आहेत. त्यातही भारताच्या लोकशाही व्यवस्थेने स्त्री—पुरूषा मध्ये समानता पाळली आहे. अशा उद्देशाच्या पुर्तेसाठी भारतात महिलांचा दर्जा आणि भारतातील दारिद्रयाचा विचार लक्षात घेता महिलांच्या विकासासाठी भारत सरकार विविध कायदे व योजना तयार करून राबवित आहे. परंतु भारत सरकारला अजूनही यापासून पाहिजे तसे यश आलेले दिसत नाही.

महिला सक्षमीकरणाची सुरूवात १९८५ च्या नैरोबीच्या महिला आंतरराष्ट्रीय अधिवेशनापासून झाली. १९८५ ते १९९५ हा काळामधील महिला सक्षमीकरणाचा मुख्य हेतू हा दारिद्रय निर्मूलनावरच(Poverty Alleviation) होता.सरकारद्वारे महिलांच्या सक्षमीकरणासाठी विविध उपक्रम हाती घेण्यात आले. त्यापैकी एक म्हणजे स्वयं सहाय्यता बचत गट (Self-help Group/SHGs) हा उपक्रम होय. बचत गटांमध्ये काही संस्था कर्ज, सुविधांचा पुरवठा करतात, त्यांना सूक्ष्म अर्थ संस्था म्हणतात.

**भारतामध्ये स्वयं सहाय्यता बचत गटांचे प्रारूप:**

भारतामध्ये स्वयं सहाय्यता बचत गटांचे (SHGs)प्रमुख तीन वेगवेगळे प्रारूप आर्थिक संस्थांच्या स्वरूपात दिसून येते.

१) बँका अर्थसहाय्य करतात

२) अशासकीय संस्थाद्वारा बचत निर्मित होते, परंतु अर्थसहाय्य बँकाकडून होते

३) बचत गटांना त्यांच्या अशासकीय संघटनासह आणि इतर संस्थासोबत बँक अर्थ सहाय्य करते.

स्वयं सहाय्यता बचत गट चळवळीचा प्रारंभ देखील १९८५ मध्ये झाला. बचत गट ही संकल्पना बांग्लादेश येथील प्रा. मोहम्मद युनूस यांची समजली जाते. त्यांनी बांग्लादेश येथील आर्थिकदृष्टया दुर्बल असणाऱ्या लोकांचे लाखो बचत गट स्थापन करून बचत गटाच्या माध्यमातून लाखो लोकांना बिनातारण कर्ज देऊन त्यांना स्वत:च्या पायावर उभे केले. त्यांच्या कार्याची दखल घेत त्यांना अत्यंत प्रतिष्ठेचा पुरस्कार म्हणजे 'नोबेल पुरस्काराने' सन्मानित केले गेले. म्हणून प्रा. मोहम्मद युनूसहे बचत गटाच्या चळवळीचे प्रमुख प्रवर्तक आहेत. भारतासारख्या विकसनशील देशातच नव्हे तर विकसित देशांमध्ये सुद्धा स्वयं सहाय्यता बचत गटाची चळवळ ही स्वयं सहाय्यता समूह विविध संकल्पनेतून साकार झालेली आहे. स्वयं सहाय्यता गटाच्या चळवळीत प्रा. युनूस यांनी ५. ५महिलांचे ४० गट करून लघुवित्त संकल्पनेला प्रथम जन्म दिला, त्यांच्या प्रेरणेतून ही चळवळ निर्माण झालेली आहे. साधारणत: बचत गटात १० ते २० महिलांचा सहभाग असतो. या गटात महिलाद्वारेबचती योग्य रक्कम प्रत्येक महिण्याला विविध स्त्रोताकडून पैसे गोळा करण्यात येते. सर्वसामान्यपणे गटाचे सर्व सदस्य दारिद्रय रेषेखालील (Below Poverty Line/BPLs) कुटुंबातील असले पाहिजेत. त्याचप्रमाणे आवश्यक असल्यास जास्तीत जास्त २०%आणि अपवादात्मक प्रकरणांमध्ये, जेथे आवश्यक असेल तेथे, गटातील कमाल ३०%सदस्यांना बीपीएल कुटुंबांसोबत सतत राहणारे जर ते बीपीएल कुटुंबातील सदस्याना मान्य असतील तर दारिद्रय रेषेच्यावर राहणाऱ्या कुटुंबातील घेतले जाऊ शकते. त्याचप्रमाणे विशिष्ट अपंग व्यक्तींच्या बाबतीत तयार केलेले गट शक्यतो अपंगत्व असले पाहिजेत. तसेच अपगत्वाचे विशिष्ट गट तयार करण्यासाठी पुरेसे लोक उपलब्ध नसल्यास, एका गटात विविध अपंग किंवा समूह असू शकतात. गरीबी रेषेखालील दोन्ही अपंग आणि अपंग व्यक्तींचा समावेश असू शकतो.

पुरूषांच्या बरोबरीने महिलांना सक्षम करण्यासाठी स्वयं सहाय्यता बचत गट योजना महिलांच्या आर्थिक स्वावलंबनात महत्वाची भूमिका पार पाडते. स्वयं सहाय्यता बचत गट योजना भारताने स्वीकारली. स्वयं